फेब्रुवारी २००७

# पतसंस्थांचे आत्मपरिक्षण

आजचे दिवस मागून मिळवायचे नसून आत्मपरिक्षणाचे आहेत. भारतासारख्या लोकशाही देशात धनदांडगे व सत्ताधिशांशिवाय सर्वसामान्यांना आर्थिक न्याय व आर्थिक उन्नती करून घेण्याचे व मागून मिळवायचे दिवस पुसट होत चाललेले आहेत. जोपर्यंत वरच्या वर्गाला झळ पोहोचत नाही, तोपर्यंत सर्वसामान्य जनतेच्या व सर्वसामान्यांनी उभ्या केलेल्या संस्थांच्या झोळीत आवश्यक तेवढे देण्याची दानत लोप पावत चाललेली आहे. आणि ही बाब पतसंस्थांमध्ये काम करणाऱ्या कार्यकर्त्यांनी, पदाधिकाऱ्यांनी व कर्मचाऱ्यांनी समजून घेण्याची व त्यावर मात करून मार्ग काढण्याची आवश्यकता आहे.

जसे मद्यपान करून, मद्यपान करू नका असे प्रबोधन करणे अप्रस्तुत आहे, त्याचप्रमाणेच पतसंस्थांच्या सर्वार्थाने आर्थिक उत्थानासाठी सहकार खाते, राज्य सरकार व केंद्र सरकार यांचेकडून अशाप्रकारची अपेक्षा करणे पतसंस्थांच्या हिताचे नाही. म्हणून महाराष्ट्र राज्यातील पतसंस्थांनी आपापली पतसंस्था आर्थिकदृष्ट्या सक्षम होण्यासाठी, सभासदांच्या आर्थिक कल्याणासाठी व ठेवीदारांच्या ठेवींचे संवर्धन-संरक्षण करण्यासाठी सर्व स्तरावर सर्व बाजूंनी आत्मपरिक्षण करण्याची तातडीची व नितांत आवश्यकता आहे.

प्रामुख्याने पतसंस्थांमध्ये पतसंस्थेचा उपविधी, सहकार कायदा यावर आधारित शासनाचे जी.आर व इतर परिपत्रके यावर विसंबून राहून केवळ पतसंस्थांना कारभार करणे इथूनपुढे योग्य ठरणार नाही. त्याच्या पुढे जावून खाली उल्लेखिलेल्या महत्त्वाच्या बाबींमध्ये स्वत:च्या पतसंस्थेच्या बाबतीत निकष व नियोजन याचा सुरेख संगम आखणे गरजेचे आहे. थोडक्यात पतसंस्थांच्या आर्थिक सक्षमीकरणाचा, सभासद व ठेवीदार यांच्या आर्थिक प्रगतीचा आलेख कायम उंचविण्यासाठी व पतसंस्था केव्हाही तोट्यात न जाण्यासाठी व त्यामध्ये दिवसेंदिवस खऱ्या अर्थाने वाढ होण्यासाठी खालिल गोष्टींचा विचार करून तसे धोरण आखण्याचे व त्याची अंमलबजावणी करण्याचे काम मनोनिग्रह करून राज्यातील पतसंस्थांनी उद्याचा भविष्यकाळ पतसंस्थांसाठी उज्वल करावयास पाहिजे.

पतसंस्था ही सर्वसामान्यांची चळवळ असल्यामुळे, सर्वसामान्य माणूसच डोळ्यासमोर ठेवून एकूण सर्व कामकाज होणे आवश्यक आहे. केवळ निधी उपलब्ध आहे, उपविधीमध्ये तरतूद आहे, सहकार कायद्याच्या चौकटीत बसते, सहकार खात्याची लेखी परवानगी आहे, पतसंस्थेला लेखापरिक्षणाचा 'अ' वर्ग प्राप्त झालेला आहे, वार्षिक सर्वसाधारण सभेने मंजुरी दिलेली आहे, या आधारावर पतसंस्थांचे आर्थिक सक्षमीकरण होऊ शकत नाही. खालील मुद्दे विचारात घेऊन कामकाज सुरू करावे.

पतसंस्थेचे एकूण खेळते भांडवल, स्वनिधी आधार मानून,

१. कार्यालयाची वेळ किती असावी?

२. कार्यालयास सुट्टी केव्हा असावी?

३. कर्मचारी किती असावे व त्यांचे मासिक वेतन किती असले पाहिजे?

४. कार्यालयासाठी प्रतिवर्षी फर्निचर, कॉम्प्युटर, विज व दुरध्वनी इ. साठी किती रक्कम खर्च करावयाची?

५. संचालक मंडळ सभा व वार्षिक किंवा विशेष सर्वसाधारण सभा यासाठी किती खर्च करावा?

६. संचालकांनी / कर्मचाऱ्यांनी प्रवास, मानधन यासाठी किती खर्च करावा?

७. पतसंस्थेसाठी वाहनांची आवश्यकता आहे काय?

८. प्रशिक्षणासाठी शुल्क भरल्यानंतर इतर खर्च किती करावा? (हॉटेल + जेवण + प्रवास)

९. सामाजिक बांधिलकी आणि देणग्या, जाहीराती, जेवणावळी किंवा इतर किती खर्च करावा?

१०. खेळत्या भांडवलाच्या किती प्रमाणामध्ये प्रशासकीय खर्च करावा?

११. कर्ज मंजूर करताना व उचल देताना संचालकांची बैठक केव्हा, कशी व किती संचालक उपस्थित असताना करावी, तसेच कर्जदार व त्याचे जामीनदार यांच्या घरचा पत्ता, कामाचा व व्यवसायाचा पत्ता प्रत्यक्ष भेट देवून त्याची खातर जमा कशी करावी?

१२. लेखापरिक्षण, उपविधी दुरूस्ती यासाठी अधिकृत शुल्काच्या व्यतिरिक्त वेगवेगळ्या हेडखाली खर्च टाकून किती रक्कम खर्च करावी?

१३. ठेवीदार व कर्जदार यांच्याशी प्रत्येक संचालकाने संपर्क कायम ठेवण्यासाठी जबाबदारी कशी विभागावी?

१४. नियमीत कर्ज भरणाऱ्यांना कसे प्रोत्साहन द्यावे?

१५. थकबाकीदारांवर कारवाई करताना पहिला, दुसरा, तिसरा हप्ता थकल्यानंतर या संदर्भात केव्हा, कशी कारवाई करावी?

१६. वार्षिक अहवाल छापताना किती पानांचा, किती रंगाचा व किती खर्चाचा करावा?

१७. वार्षिक सर्वसाधारण सभेच्या वेळेत सभासदांना भेट, जेवण इत्यादीसाठी किती खर्च करावा?

१८. शाखा किती उघडाव्यात?

१९. दैनंदिन ठेवीवरील व्याजदर किती असावा?

२०. कर्ज व्याजदर किती असावा?

२१. कर्जाची पगारातुन कपात कशी करावी?

२२. इमारत निधी, सर्व्हिस चार्जेस किती आकारावे?

२३. कर्जाच्या दुप्पट रकमेचा विमा कसा उतरावा?

एकंदरीत लेखापरिक्षणास वरचा वर्ग मिळवणेसाठी पतसंस्थांनी काम करण्याचे धोरण पुर्व तपासणी करून आखावे लागणार आहे. उदाहरण द्यावयाचे झाले तर केवळ सहकार खात्याने परवानगी दिली म्हणून पतसंस्थेची आर्थिक ऐपत नसताना भविष्यातील अधांतरी व खोट्या आत्मविश्वासावर विश्वास ठेवून जबाबदारी वाढवून जागा खरेदी करणे किंवा मोठ्या क्षेत्रफळाच्या जागा भाड्याने घेणे किंवा संगणकीकरणाच्या नावाखाली नवनवीन संकल्पनांना आहारी जावून प्रशिक्षणाच्या नावाखाली हजारो रुपये खर्च करणे, हे बंद करण्याची आवश्यकता आहे. भविष्यकाळात भारतीय रिझर्व्ह बँक, नाबार्ड, राज्याचे सचिव व सहकार आयुक्त यांना वर उल्लेखलेल्या बाबींमध्ये उपविधी व सहकार कायदा यात बदल करून वरील कारणास्तव प्रत्येक गोष्टींसाठी जी.आर काढावे लागणार आहेत. त्या अगोदरच आपण स्वत: दुरूस्त होवून कायदा बनविणाऱ्या व कायद्याची अंमलबजावणी करून घेणाऱ्या यंत्रणेस घाबरण्याचे कारण नाही. मधुमेह न होण्यासाठी अगोदरच साखरयुक्त पदार्थांचे अतीसेवन करणे आणि शारिरीक व्यायाम न करणे यावर बरेच लोक अगोदरच दक्षता घेत असतात व मधुमेह व इत्यादी आजाराला स्वत: पासून १०० मैल दूर ठेवतात. तसे पतसंस्थांनी आत्मपरिक्षण करून वागणे सर्वांच्या हिताचे आहे. वर उल्लेखलेल्या बाबी हे केवळ प्रबोधन नसून प्रत्यक्ष कृतीत आणण्याची संकल्पना आहे. त्यासाठी गेली ६ महिने आम्ही सर्व स्तरावर तसेच या क्षेत्रातील मान्यवरांची सखोल चर्चा करीत आलेलो आहोत. चांगले टिपणही तयार झालेले आहे. आणखी किमान ५-६ महिन्यांचा कालावधी यासाठी लागणार आहे. राज्यातील पतसंस्था खऱ्या अर्थाने चालविण्यासाठी पतसंस्थांनी स्वत:चे कार्यक्रम आखून उपविधी, सहकार कायदा व सामाजिक बांधिलकी यास अधीन राहून कसे आर्थिक सक्षम होता येईल, एवढाच उद्देश सफल आपल्या आत्मपरिक्षणामुळे होऊ शकतो हे आपणांस कृतीत आणावयाचे आहे.

(**महत्त्वाचे तात्पर्य** – केवळ पतसंस्था फायद्यात आहे, म्हणून अनावश्यक गोष्टींवर खर्च झाल्यावर १०० रूपये फायद्या ऐवजी केवळ २० रूपये फायदा होतो, ह्यास Profit but at Diminishing rate असे म्हणतात. आणि हेच दुरूस्त करण्यासाठी आत्मपरिक्षण करावयाचे आहे.)

जय हिंद ! जय महाराष्ट्र !! जय सहकार !!!